पुढारी

# सीमाभागातील महाविद्यालयांमध्ये संस्कृत विषयाचा समावेश करा

## कोल्हापूर जिल्हा वारकरी भजनी मंडळाची उच्च शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सीमाभागातील शासकीय महाविद्यालयांत संस्कृत विषयाचा समावेश करावा, अशी मागणी कोल्हापूर जिल्हा वारकरी भजनी मंडळातर्फे करण्यात आली. या मागणीचे निवेदन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांना देण्यात आले.

याबाबतचे निवेदन खा. संजय मंडलिक, आ. प्रकाश आबिटकर, आ. ऋतुराज पाटील यांनाही दिले. शिष्टमंडळात भानुदास यादव महाराज, विठ्ठल पाटील, सुभाष शिंगे (महाराज), सुखदेव पाटील, परशुराम ठमके, कणेरी मठातर्फे प्रा. एम. डी. पाटील, श्रीकांत खटाळे यांचा समावेश होता.

### यादीत आप्पाचीवाडीच्या समावेशाची मागणी

सीमाभाग यादीत आप्पाचीवाडी या गावाचा समावेश करावा, अशी मागणी मंत्री उदय सामंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर विश्वनाथ हिंग्लजे, बाळासाहेब गारगोटे, सूर्याजी पोटले यांच्या सह्या आहेत.

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने केलेल्या बेकायदेशीर कामांची उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांमार्फत चौकशी करावी, अशी मागणी राजर्षी शाहू सेनेने केली आहे. या मागणीचे निवेदन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांना देण्यात आले. निवेदनावर शुभम शिरहट्टी, गिरीश मोरे, नागराज कंबार, लहूजी शिंदे, राकेश देसाई यांच्यासह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

महाविद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रश्न निकाली काढावेत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाने केली आहे. या मागणीचे निवेदन मंत्री सामंत यांना देण्यात आले.

शिष्टमंडळात प्रा. अनिल घाटगे, हितेंद्र साळुंखे, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य भय्या माने, जिल्हा बँकेचे संचालक पी.जी. शिंदे, ॲड. सुरेश कुराडे उपस्थित होते.

निवेदनावर बाळासाहेब मोहिते, श्रीमती शीतल खानविलकर, श्रीकृष्ण कातवरे, बाजीराव शेंडे यांच्यासह २२ कर्मचाऱ्यांच्या सह्या आहेत.

सहायक प्राध्यापक भरती त्वरित सुरू करा, अशी मागणी नेट-सेट पीएच.डी.धारक कृती समितीने मंत्री सामंत यांच्याकडे केली आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र गडहिंग्लज येथे करा

## शिवसेनेची उच्च शिक्षणमंत्र्यांकडे मागणी



कोल्हापूर : गडहिंग्लज येथे शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन मंत्री सामंत यांना देताना विजय देवणे, खा. संजय मंडलिक, आ. प्रकाश आबिटकर. (छाया : पप्पु अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र गडहिंग्लज येथे करा, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. जिल्हाप्रमुख विजय देवणे यांनी या मागणीचे निवेदन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांना दिले.

निवेदनात म्हटले आहे, गडहिंग्लज, आजरा, चंदगड व सीमाभागातील आणि गारगोटी, कापशी खोऱ्यातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर शिक्षणाची सोय होण्यासाठी विद्यापीठाच्या उपकेंद्राची गरज आहे. सीमाभागात मराठी महाविद्यालय सुरू करण्याच्या निर्णयाने या भागात आनंदाचे वातावरण आहे. या भागात अनेक मोठ्या शिक्षण संस्था आहेत. विचारवंत, शास्त्रज्ञ, संशोधक तसेच मराठीचा गाढा अभ्यास करणारे आहेत. या सर्वांचे या केंद्रास मार्गदर्शन मिळणार आहे. या भागातील विद्यार्थ्यांना केंद्राचा फायदा होणार आहे. निवेदनावर विजय देवणे, संजय पोवार यांच्या सह्या आहेत. मंत्री सामंत यांना निवेदन देताना खा. प्रा. संजय मंडलिक, आ. प्रकाश आबिटकर, युवा सेनेचे मंजित माने उपस्थित होते.

My Kolhapur Edition
21 July, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

पुढारी

# सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांसाठी शिनोळीत शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र

## आ. राजेश पाटील यांची माहिती

**चंदगड : पुढारी वृत्तसेवा**

सीमाभागातील विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण घेता यावे आणि कॅम्पस सिलेक्शनमधून नोकरीची संधी मिळावी यासाठी सीमाभागालगत शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे, अशी मागणी सरकारकडे केली होती. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ येथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्यासोबत बैठक पार पडली. यावेळी उपकेंद्राला मान्यता मिळाली असल्याचे आ. राजेश पाटील यांनी दै. 'पुढारी'शी बोलताना सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्रामुळे मराठी भाषेचा जागर सीमाभागात कायम राहील, असेही त्यांनी सांगितले. तसेच कला, वाणिज्य, विज्ञान हे पारंपरिक शिक्षण देणे हे उद्दिष्ट न ठेवता व्यापक विचार केला आहे.



**मुंबई : शिवाजी विद्यापिठाच्या उपशाखेबाबत चर्चा करताना आमदार राजेश पाटील व मंत्री.**

दरम्यान, या उपकेंद्रातून शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून वेगवेगळे व्यावसायिक अभ्यासक्रम चालू करण्यात येणार आहेत. त्यामुळे सीमाभागातील युवक स्वत:च्या पायावर उभा राहील. सर्व लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र एकीकरण समिती, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्था अशा अनेक संस्था यांची एक व्यापक बैठक घेण्यात येणार आहे. या उपकेंद्रासाठी शिनोळी बुद्रुक, शिनोळी खुर्द व तुडये ग्रामस्थांनी हे शैक्षणिक संकुल उभा करण्यासाठी जमीन स्वेच्छेने देण्याचे ठरवले आहे.

# सीमा बांधवाच्या पाठीशी ठाकरे सरकार

प्रतिनिधी
चंदगड

महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सर्व कमिटी, खासदार प्रा. संजय मंडलिक, आमदार राजेश पाटील यांची बैठक होऊन शिनोळी येथे स्वतंत्र मराठी भाषिक महाविद्यालय सुरू करण्यावर शिक्कामोर्तब झाला.

हे महाविद्यालय नेमके कुठे होणार ? याबाबत संभ्रम होता. अनेक जागांची पहाणी झाली होती. मात्र शिनोळीची निवड होऊन या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. यापूर्वीही शिवसेना सीमाबांधवाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आहे. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा गाढा अभ्यास आहे. सीमाभागातील मराठी बांधवांना ते परके मानत नाहीत. राज्यात तर आता शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे महाविकास आघाडीच्या माध्यमातून मुख्यमंत्री आहेत. त्यामुळेच आता सीमाभागात मराठी भाषेच्या संवर्धनाला चालना मिळणार आहे. दोन वर्षापूर्वी शिनोळी येथे शिवसेना जिल्हा उपप्रमुख प्रभाकर खांडेकर यांच्या विनंतीला मान देत उध्दव ठाकरे शिनोळी येथे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या लोकार्पण सोहळ्यासाठी उपस्थित राहिले होते. त्यावेळी त्यांनी सीमाभागातील बांधवांसाठी स्वतंत्र महाविद्यालय देण्याचीही घोषणा केली होती. तो शब्द त्यांनी पाळला असून महाविकास आघाडीनेही त्यांना चांगली साथ दिली आहे. त्यामुळे चंदगड तालुक्याबरोबरच सीमाभागातील मराठी बांधवांना एक स्वतंत्र महाविद्यालय मिळणार आहे. त्या महाविद्यालयासाठी आमदार राजेश पाटील, शिवसेना जिल्हा उपप्रमुख प्रभाकर खांडेकर तसेच शिनोळी ग्रामपंचायतीचेही योगदान लाभले आहे. या निर्णयाचे स्वागत होत आहे.

**शिनोळीत शासकीय महाविद्यालय मंजुर**

# विद्यापीठात पाच टक्के कर्मचारी उपस्थिती

कोल्हापूर : जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने समूह संसर्गाचा धोका टाळण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशानुसार सोमवार ते शनिवार (दि.२५)पर्यंत पाच टक्के कर्मचारी कामावर उपस्थित राहणार आहेत. उर्वरित कर्मचारी वर्क फ्रॉम होम करतील. त्याबाबतचे परिपत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी काढले आहे.